एमएमआरडीए
MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

प्लॉट क्र. आर-५, आर-६, आर-१२, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

वेबसाईट : **https://mmrda.maharashtra.gov.in**

## महाराष्ट्रातील कुशल/अकुशल कामगारांना मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या विविध पायाभूत प्रकल्पांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई व ठाणे जिल्हा तसेच रायगड, पालघर जिल्ह्यातील काही भागांमध्ये कंत्राटदारांकडून विविध पायाभूत प्रकल्पाचे कामकाज केले जाते. कोविड-१९ च्या लॉकडाऊन नंतर सदर कंत्राटदाराकडे असलेले काही कुशल/अकुशल कामगार स्वग्रामी गेल्यामुळे सदरच्या प्रकल्पामध्ये कामगारांचा तुटवडा जाणवत आहे व त्याचा विपरित परिणाम प्राधिकरणाच्या पायाभूत सुविधा उभारणीमध्ये होत आहे.

माननीय श्री.उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी प्राधिकरणातील सदर रोजगाराच्या संधी महाराष्ट्रातील कुशल/अकुशल कामगारांना उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत. प्राधिकरणातील पायाभूत प्रकल्पामध्ये खालील रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | कामाचा प्रकार | कामाचे स्वरुप | संख्या |
|---|---|---|---|
| १. | गवंडी (Mason) | अवजड पायाभूत प्रकल्पांमध्ये पाया (Pile, Foundation etc.) कॉलम/पिअर, स्लॅब/डेक स्लॅब इत्यादीसाठी काँक्रीटीकरण करणे, मेट्रो स्थानके तसेच प्रकल्पानूसार वीट बांधकाम व गिलावा करणे (Brick work & Plastering), ग्रॅनाईट फरशी बसवणे, इत्यादी. | २७४ |
| २. | सूतारकाम (Carpenters) | पायाभूत प्रकल्पातील विविध कामांसाठी शटरींग बसविणे बहुतांश शटरींग हे स्टीलचे आहेत. | २६७८ |
| ३. | फिटर (स्टिल फिक्सिंग करणारे) | पायाभूत प्रकल्पामध्ये लागणारे विविध प्रकारचे स्टील सेक्शन फॅब्रिकेट करणे. | ३६६ |
| ४. | फिटर (बार बेंडिंग व फिक्सिंग करणारे) | पायाभूत प्रकल्पासाठीच्या संरचनेमध्ये लोखंडी सळी बांधणे (Reinforcement, Bar Bending & Fixing) | ३३५९ |
| ५. | वेल्डर | पायाभूत प्रकल्पामध्ये आवश्यक ठिकाणी वेल्डिंगचे काम करणे | ४२३ |
| ६. | इलेकक्ट्रिशन, वायरमन | पायाभूत प्रकल्पामध्ये आवश्यकतेनूसार इलेक्ट्रीकल व वायरिंगची कामे करणे. | २१६७ |
| ७. | अकुशल कामगार | पायाभूत प्रकल्पासाठी रेती, दगड, विटा इत्यादी बांधकाम साहित्य उचलणे व वरील सर्व कुशल कामगारांना सहाय्य करणे. | ७४५९ |
| | | एकुण | १६७२६ |

कामाचे स्वरुप : सदर स्थापत्य कामामध्ये मुख्यत्वे पाया उभारणी, मेट्रो खांबांची उभारणी, उन्नत मार्गाचे बांधकाम, रत्याचे बांधकाम, मेट्रो स्थानकांच्या सजावटीसाठी लादी बसविणे व इतर कामांचा समावेश आहे. सदरहू कामे करण्याकामी लोखंडी सळीची बांधणी (**fitters**), ढाच्याची बांधणी करण्याकामी **(carpenters)**, काँक्रीट करण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. तसेच बांधकामा दरम्यान खोदकामे, साफसफाई व इतर कामांकरिता मोठ्या प्रमाणात अकुशल कामगारांची देखील आवश्यकता आहे.

सदर प्रकल्प हे अवजड स्वरुपाचे पायाभूत प्रकल्प असून बहूतांश कामे ही वर्दळीच्या रस्त्यावर आहेत. बहुतांश ठिकाणी पाईल स्वरुपाचे पाया **(Foundation)** असून पियर/कॉलमची उंची साधारण ८ मीटर ते १७ मीटर पर्यंत (सुमारे २५ फुट ते ५५ फूटांपर्यंत) असून रुंदी/व्यास साधारण २ मी.(६.५ फूट) इतकी आहे. प्रकल्पामधे वापरले जाणारे बहुतांश स्टील **(Reinforcement Bar)** अधिक जाडीचे आहेत. सदर माहिती ही प्राथमिक स्वरुपाची असून फक्त प्रकल्पाची व्याप्ती लक्षात येण्याकरिता दिली आहे.

Mission MPSC
The Right Way to Succeed in MPSC

कामगारांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा : मुख्य कंत्राटदाराने निवड केलेल्या कामगारांची राहण्याची व्यवस्था तात्पुरत्या कामगार वसाहतीमध्ये करण्यात येईल. सदर वसाहतीमध्ये निवासाची सोय, पाण्याची व विजेचा पुरवठा मोफत करण्यात येतो. कामगार वसाहती पासून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी ने-आण करण्याची मोफत सोय करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार लघु कंत्राटदारास कामगारांच्या जेवणासाठी आगाऊ रकमेचा देखील पुरवठा केला जाईल. प्रकल्पाच्या बांधकामात सामील असलेल्या मनुष्यबळाचे आरोग्य, सुरक्षा, विमा, इत्यादी बाबींची जबाबदारी मुख्य कंत्राटदारांच्या कंत्राटातील अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

तसेच आवश्यक अनुभव/अर्हता नसणाऱ्या परंतु काम करण्यास इच्छुक असणाऱ्या **कुशल/अकुशल कामगारांना एक महिन्याचे मोफत प्रशिक्षण देण्यात येईल. यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सदर कामगारांना संबंधीत कंत्राटदाराकडून प्रत्यक्ष कामासाठी नेमणूक करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीत सबंधीत कंत्राटदाराकडून मानधन देण्यात येईल. सर्व इच्छुक कामगारांनी / कामगार पुरवठा कंत्राटदारांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.**

**इच्छुक कामगारांनी / कामगार पुरवठा कंत्राटदारांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.**

| कंत्राटदाराचे नाव | संपर्कासाठी नाव | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | श्री. सुरज सेल | ९१६७२२४५६२ |
| | श्री. मयंक जैन | ८८६०७६५५६६ |
| | श्री. प्रशांत जोशी | ९९०९९२७७२० |
| मे. एन.सी.सी. लि. | श्री. महादेवन | ९०००६०७३३३ |
| | श्री. सिध्दार्थ कामत | ८२९१९१२३९७ |
| मे. गोदरेज बॉइस | श्री. मयांक शाह | ९१८७२३५०९२ |
| | श्री. विनोद जैन | ९८६७७१०००३ |
| मे. इंजि. पायोनियर फ्रॅब्रिकेटस | श्री. मनोज कुमार | ९९९९५५२०७४ |
| मे. आय.टी.डी.सी. | श्री. विजय इंगळे | ७०६६०३१४४८ |
| मे. स्टर्लिंग आणि विल्सन | श्री. विश्वास | ८१३००२५४३४ |
| मे. आर इन्फ्रा | श्री. अभिजीत ठाकुर्ता | ९८८००३१३७५ |
| मे. रेलकॉन इन्फ्रा | श्री. सिजो जॉन | ९८२०६३३८८५ |
| | श्री. निखिल शहा | ८७७९१२९५७५ |
| मे. अजवानी इन्फ्रा | श्री. पांडुरंग कुलकर्णी | ८६९२०५०००० |

| कंत्राटदाराचे नाव | संपर्कासाठी नाव | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| मे. टाटा प्रोजेक्टस लि. | श्री. इफितकार तारापुरवाला | ९१३६९६९५५२ |
| | श्री. अनिल पाटील | ९१६७२२४५४३ |
| मे. इगल इन्फ्रा इंडिया | श्री. जय चुग | ७५०७९९६००० |
| मे. ऑफकॉन्स इन्फ्रा. लि. | श्री. हरिष साळुंखे | ९८७०५२५२१४ |
| मे. एल अॅन्ड टी | श्री. युनुस अजिज | ८२९१०८४७०३ |
| | श्री. अनिल राव | ७९८०२८५२४१ |
| मे. टाटा प्रोजेक्ट | श्री. मनोज सानप | ७००८१४९३२५ |
| | श्री. कोलिन | ९७९१००९५८८ |
| | श्री. प्रदीप उमाटे | ९१६७२२४५५७ |
| मे. एस. एम. सी. | श्री. समीर फनसे | ९८२०११५६०३ |
| मे. शापुरजी पालनजी | श्री. उमेश साळूंखे | ९२२३३२२८४५ |
| मे. टी अँड टी | श्री. चंदु पोखरकर | ७७५५९८४७११ |
| मे. आर. पी..एस. | श्री. गणेश घोलप | ९३२४०१८९६५ |

मुं.म.प्र.वि.प्रा. द्वारे विविध पायाभूत प्रकल्पाच्या कामाकरीता निविदा प्रसिध्द करुन कंत्राटदार नेमण्यात येतात. उपरोक्त नमूद केलेल्या कामगारांची वेतन **निश्चिती आणि नियुक्ती संबंधीत कंत्राटदाराकडून करण्यात येईल.**

सबब महाराष्ट्रातील सर्व कुशल/अकुशल कामगार अथवा कामगार पुरवठा कंत्राटदारांनी वर नमूद केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून नेमलेल्या कंत्राटदारांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधावा. संबंधीतांनी प्रतिसाद न दिल्यास मुं.म.प्र.वि.प्रा. च्या दूरध्वनी क्र. ०२२-२६५९१२४१ / २६५९४१७६ व मोबाईल क्र. ८६५७४०२०९० वर संपर्क साधावा.

Mission MPSC
The Right Way to Succeed in MPSC

सही/-

महानगर आयुक्त

मुं.म.प्र.वि.प्रा.

दिनांक : १५/०६/२०२०

ठिकाण : मुंबई

Fulrani